# अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन मुंबई यांचे कार्यालय

एस.आर.अे.बिल्डींग, अे-विंग, दुसरा मजला, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा(पू), मुंबई-४०० ०५१.
कार्यालय फोन व फॅक्स क्र: ०२२-२६५९१५८६, E-mail: dcfmangrovecell@gmail.com

**विषय**:- कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीच्या बैठकीचे मंजूर इतिवृत्त.

जा.क्र.कक्ष-१/ल.ले/ ५९ /सन २०१८-१९
बांद्रा, मुंबई ४०० ०५१ दिनांक: १६/०८/२०१८.

**प्रति,**

१. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई.
३. जिल्हाधिकारी, मुंबई/ मुंबई उपनगर/ ठाणे/ पालघर / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग.
४. पोलिस आयुक्त, मुंबई/ठाणे यांचे प्रतिनिधी.
संबंधित जिल्हा पोलीस अधिक्षक, [ठाणे (ग्रामीण) /पालघर/ रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग]
५. संचालक, पर्यावरण विभाग.
६. अपर आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग.
७. महानगर पालिका आयुक्त / सह आयुक्त (मुंबई / नवी मुंबई / ठाणे / मिरा भाईंदर/ वसई-विरार / कल्याण-डोंबविली / भिवंडी निझामपुर / उल्हासनगर.)
८. श्री. दयानंद स्टॅलिन, संचालक, वनशक्ती अशासकीय संस्था.
९. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ.
१०. नगर रचना विभागाचे अधिकारी / CIDCO यांचे प्रतिनिधी.
११. डॉ. महेश शिंदीकर, Applied dept of Science, College of Engineering Pune.

उपरोक्त विषयान्वये कोकण विभागातील वेटलँड संदर्भात पाणथळ तक्रार निवारण समितीची **१६** वी बैठक दिनांक **२०/०६/२०१८** रोजी मा. विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचे कार्यालय, जुने सचिवालय, फोर्ट, मुंबई येथे घेण्यात आली सदर बैठकीचे मंजूर इतिवृत्त माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात येत आहे.

सदस्य सचिव,
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा
उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई.

**कोकण विभागातील वेटलॅन्ड संदर्भात पाणथळ तक्रार समितीची १६ वी मासिक बैठक दि.२०/०६/२०१८ च्या बैठकीमध्ये सदस्य सचिव यांनी उपस्थित सभासदांचे स्वागत केले व सभेला सुरुवात केली.**

| अ.क्र | मुद्दा | करावयाची कार्यवाही | अंमलबजावणी करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| १ | a) श्री.अनंत दत्तात्रय पाटील :- (मौजे भुईगांव सर्वे क्र. 220)<br>b) श्री. फ्रान्सिस डिसोजा:- (मौजे भुईगांव सर्वे क्र. 220) | • या तक्रारी संदर्भात उपस्थित जिल्हाधिकारी पालघर यांच्या प्रतिनीधींनी या विषयासंदर्भात पुढील सुनावणी दि.१४/०६/२०१८ रोजी असल्याचे सांगितले होते.<br>• परंतु सदर विषय हा बऱ्हेच महिने प्रलंबित असल्याने समितीने सदस्य सचिवांना जिल्हाधिकारी पालघर यांना पत्र पाठवून या विषया संबंधित खुलासा सादर करण्याबाबत सांगितले होते.<br>• त्यानुसार जिल्हाधिकारी पालघर यांनी बैठकीमध्ये SDO यांच्यामार्फत सदर प्रकरण मा.दिवाणी न्यायालयाच्या निदर्शनास आणले आहे.<br>• तसेच तहसिलदार वसई यांनी सरकारी अभियोक्ता, ता. वसई जि. पालघर यांना पत्र पाठविण्यात आले असून त्या बाबतमी कागदपत्रे समितीपुढे सादर केली.<br>• सदस्य सचिवांनी या व्यतिरीक्त ज्या जागेवर स्टे नाही त्या उर्वरित जागेवरील अतिक्रमण हटविण्याबबत आदेश समितीने दिले होते या बद्दल विचारणा केली असता SDO यांनी अतिक्रमण हटविण्याचे काम सुरु आहे असे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने सदरचा विषय बऱ्हेच महिने प्रलंबित असल्याने आता या पुढील ३ महिन्यात पावसाळयाच्या कालावधीत योग्य रितीने नियोजन करुन त्या बाबतचा (Action Plan) सादर करण्याबबत सांगितले व पावसाळयानंतर त्वरीत अतिक्रमण हटविण्यास सांगितले.<br>• वरील आदेश देऊन समितीने ही तक्रार बंद करण्याचे आदेश दिले आहेत. | जिल्हाधिकारी, पालघर |
| २ | a) श्री. कुलदिप चौधरी (मौजे नायगाव जि. पालघर )<br>b) श्री. अनिकेत स. वाडीवकर (आगाशी ता. वसई जि. पालघर)<br>c) श्री. मॅकेन्झी डांबरे (भुईगांव, वसई जि. पालघर)<br>d) श्री. स्टॅलिन डी (आगाशी ता. वसई जि. पालघर) | समितीने सदर जागेचे Restoration करुन जागेवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल,छायाचित्रे आणि संबंधित सर्व कागदपत्रे सादर करण्याबाबत व जिल्हाधिकारी पालघर या विषया संबंधित खुलासा सादर करण्याबाबत समितीने सांगितले होते.<br>• या बाबत उपस्थित SDO यांनी सदर जागेच्या Restoration साठी वसई विरार महानगरपालिकेला पत्राद्वारे कळविण्यात आले आहे.<br>• या संदर्भात समितीने सदर जागेवर कांदळवन असल्यास तेथील जूने डेब्रिज हटविण्यास फार | जिल्हाधिकारी, पालघर व सदस्य सचिव |

| | | | |
|---|---|---|---|
| | | अडचणी येतात व त्यासाठी फार खर्च देखील येतो. त्याअनुषंगाने सदर जागेवर Deep Channelling करुन भरतीच्या प्रवाहाच्या दिशेने व्यवस्थितरीत्या ती जागा पुन्हा Restore होऊ शकते असा निर्णय घेतला.<br>• त्या अनुषंगाने समितीने SDO यांना या प्रकरणाबाबत केलेल्या कार्यवाहीबाबतचा (Action Plan) अहवाल सादर करण्याबबत सांगितले. | |
| ३ | **धीरज परब:-**<br>ईमेलद्वारा प्राप्त अर्ज | • समितीने या संबंधी ज्या ६ तक्रारी प्राप्त आहेत त्या जागेवर स्थळ पहाणी करुन प्रत्येक तक्रारीचा वस्तूस्थिती अहवाल सादर करण्यास सांगितले.<br>• त्यानुसार उप आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी त्यांचा अहवाल बैठकीत सादर केला. अहवालानुसार त्यांनी काही परिसरातील अनधिकृत बांधकामे निष्कासीत करुन, माती भराव इत्यादी कामे पुर्ण केलेली आहेत आणि काही परिसरातील कार्यवाही चालू आहे असे उप आयुक्त मिराभाईंदर महानगरपालिकेने सांगितले<br>• समितीने प्राप्त अहवाल सर्व सदस्यांना देण्याबाबत सांगितले. | आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका. |
| ४ | **श्री. नंदकुमार पवार:-**<br>(बाळकुम, कशेरी, काल्हेर, अंजूर दिवा) | या तक्रारी संदर्भात उपवनसंरक्षक ठाणे यांच्याकडून अहवाल प्राप्त झाला आहे.<br>• अहवालानुसार सर्वे क्र. २५२ व १८० अंजूर दिवे येथील अतिक्रमण दि.१५ मार्च २०१८ रोजी हटविण्यात आले आहे. परंतु सदर जागेवर २ ते ४ मीटर उंचीचा मोठया प्रमाणात भराव झालेला असल्यामुळे भराव काढल्यानंतरच सदर जागेवर कांदळवन रोपवन करता येणे शक्य होईल व सद्यस्थितीत सदर क्षेत्रात Mangrove associate प्रजातींची लागवड करण्याची तजवीज ठेवली आहे असे सांगितले.<br>• समितीने अंजूर दिवा येथील जागेवर शक्य असल्यास Deep Channelling करण्याबाबत उपवनसंरक्षक ठाणे यांना सांगितले.<br>• समितीने प्राप्त अहवाल सर्व सदस्यांना पाठविण्याबाबत सांगितले.<br>• उर्वरीत जागेवर Restoration करण्यासाठी निवासी जिल्हाधिकारी, ठाणे यांनी MMRDA यांना पत्राद्वारे कळविले आहे असे सांगितले.<br>• त्यानुसार समितीने यात काही विरोध नसल्यास ही तक्रार बंद करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | जिल्हाधिकारी ठाणे, उपवनसंरक्षक ठाणे व सदस्य सचिव |

| | | | |
|---|---|---|---|
| | | • समितीने MMRDA यांच्या प्रतिनिधींना पुढील बैठकीमध्ये उपस्थित राहण्याबाबतचे पत्र पाठविण्याबाबत सदस्य सचिवांनी सांगितले. | |
| ५ | **श्री. नंदकुमार पवार:-**<br>Distruction and reclamation of mangroves and Wetlands at Dronagiri Node, Uran. | • या तक्रारी संदर्भात सिडको यांच्या प्रतिनिधींनी त्यांचा अहवाल सादर केला त्यामध्ये त्यांनी दि. २१ डिसेंबर २०१५ रोजीचा मा.उच्च न्यायालयाची परवानगी असल्याचा आदेश समितीपूढे सादर केला.<br>• समितीने सिडको यांचा अहवाल सर्व सदसांना पाठविण्यात यावा असे सांगितले व त्या अनुषंगाने या अहवालाबद्दल कोणाला विरोध असल्यास त्यांनी याबाबत पुढील बैठकीमध्ये माहिती द्यावी व त्यानुसार ही तक्रार बंद करण्यात येईल असे सांगितले. | जिल्हाधिकारी, रायगड आणि सिडको |
| ६ | **अज्ञात व्यक्ती - KW2**<br>Lots of trucks dumpers dumping the red clay in Mangrove. (स्थळ:- सेक्टर-२३ घनसोली, नवी मुंबई ) | • या तक्रारी संदर्भात सिडको यांच्या प्रतिनिधींनी सदर जागेवरील डेब्रीज हटविण्याचे काम पूर्ण झाले आहे असे सांगितले त्याबाबतचा अहवाल सादर करण्याबाबत समितीने सिडको यांना सांगितले होते.<br>• त्यानुसार सिडको यांच्या प्रतिनिधींनी अहवाल तयार असून तो त्वरीत सदस्य सचिवांना देतो असे सांगितले. | सिडको |
| ७ | **तकारदार श्री. अक्षय पाटील**<br>**Complaint ID No- KW5**<br>Website द्वारा तक्रार प्राप्त दि.१२.०२.२०१८ -<br>विषय:- Illegal mangrove cutting<br>(स्थळ :- विटावा ता. जि. ठाणे) | • सदर तक्रारी संदर्भात प्रत्यक्ष स्थळाचा उल्लेख केलेला नसल्याने अर्जदाराला संपर्क केला असता वा इमेल वर संपर्क साधला असता तक्रारदाराकडून कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही.<br>• त्या अनुषंगाने समितीने सदर तक्रार बंद करण्याबाबत सांगितले. | महानगरपालिका ठाणे |
| ८ | **श्रीमती श्वेता भट**<br>दि.०६.०२.२०१८<br>Destruction of mangrove behind Hiranandani, Kavesar, Thane. | • या तक्रारी संदर्भात स्थळ पहाणीबाबतचा चर्चा केली असता सदर प्रकरणी FIR नोंदविण्याचे अधिकार SDO यांनाच असल्याने त्यांनी पुन्हा जिल्हाधिकारी कार्यालय, कांदळवन कक्ष व पोलीस विभाग यांच्या समवेत पहाणी झाली पाहिजे असे महानगरपालिका यांच्या प्रतिनिधींनी सांगितले.<br>• त्यानुसार सदस्य सचिवांनी कांदळवन कक्षाच्या वतीने प्रतिनिधी स्थळ पहाणीस उपस्थित राहतील असे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने दि.२६/०६/२०१८ रोजी TMC, महसूल, कांदळवन कक्ष, पोलीस यांचे प्रतिनिधी व तक्रारदार यांच्या सोबत स्थळ पहाणी करण्याचे समितच्या बैठकीत ठरले आहे.<br>• सदस्य सचिवांनी MRSAC यांच्या वेबसाईटद्वारे | महानगरपालिका ठाणे आणि सदस्य सचिव |

| | | | |
|---|---|---|---|
| | | पाणथळ क्षेत्र NWIA यादीतील क्षेत्र आहे किंवा नाही याबाबत माहिती प्राप्त होत होती परंतु सदरची वेबसाईट काही कारणास्तव बंद झाल्याचे समितीला सांगितले.<br>• त्या अनुषंगाने MRSAC यांना पत्र पाठवून या वेबसाईडबाबत माहिती घेऊन वेबसाईट पुन्हा चालू करण्याबाबत समितीने सदस्य सचिवांना सांगितले. | |
| ९ | **तकारदार श्री. स्टॅलिन डी**<br>Email द्वारा तक्रार प्राप्त दि.१५.०२.२०१८<br>विषय :- Illegal dumping on wetlands along JVLR and Eastern express highway<br>(स्थळ :- जोगेश्वरी विक्रोळी रोड, मुंबई) | • श्री. स्टॅलिन यांनी JVLR ला लागून असलेले जे दोन गेट आहेत ते बंद करण्याबाबत सांगितले जेणेकरुन त्या ठिकाणी डेब्रिज पुन्हा जमा होणार नाही. त्यानुसार समितीने मुंबई महानगरपालिका यांना सदर जागेवरील गेट बंद करण्याबाबतच्या सूचना दिल्या होत्या,<br>• परंतु BMC यांच्या प्रतिनीधींनी सदर जागाही BMC ची नसून सॉल्ट विभागाची आहे असे सांगितले.<br>• परंतु समितीने BMC यांना मागील बैठकीत दिलेल्या आदेशाचे पालन करण्यास सांगितले.<br>• समितीने या तक्रारी संदर्भात FIR दाखल करण्याबाबत SDO यांना सांगितले.<br>• या तक्रारी संदर्भात EPA 1986 अंतर्गत कोणती यंत्रणा FIR दाखल व Investigation करेल व याबाबत चर्चा करण्यात आली. त्यानुसार समितीने या संदर्भात Legal Opinion घेण्याचे ठरविले आहे. | मुंबई महानगरपालिका |
| १० | **श्री. धिरज परब**<br>भाईंदर पश्चिम, येथे मुर्धा रेव आगार भागात सरकारी जागेत नैसर्गिक पाळथळाचा ऱ्हास झाल्याबाबत.<br>स्थळ :- भाईंदर प, जि.ठाणे. | या तक्रारी संदर्भात उप-आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी या तक्रारी संदर्भात लेखी अहवाल समितीपुढे सादर केला. समितीने सदर अहवाल समितीच्या सर्व सदस्यांना दाखविण्याचे आदेश दिले आहेत. | आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| ११ | **श्री. धिरज परब**<br>भाईंदर पश्चिम राधा स्वामी सत्संग व परिसरात पाणथळ, कांदळवनाच्या ऱ्हासाबाबत.<br>स्थळ :- भाईंदर प.जि. ठाणे. | | |
| १२ | तक्रारदार अभिव्यक्ती गृप<br>Please save Secctor 19 Pond<br>स्थळ:-से. १९ खारघर, नवी मुंबई. | या तक्रारी संदर्भात समितीने मा.उच्च न्यायालयाचे दि.७ जून २०१८ च्या आदेशानुसार सदर जागेवरील काम बंद करण्याबाबतचे आदेश आहेत. त्यानुसार | सिडको<br>आणि<br>जिल्हाधिकारी रायगड |

| | | | |
|---|---|---|---|
| १३ | **श्री. नरेशचंद्र सिंघ**<br>**टिप्पणीतील मुद्दा क्र. १८**<br>Please Immediately stop the Destruction of Mangroves, water bodies and wetland in Kharghar. | समितीने मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन करण्याबाबत सिडको आणि जिल्हाधिकारी रायगड यांच्या प्रतिनीधींना सांगून ही तक्रार बंद करण्याबाबत सांगितले. | |
| १४ | **तक्रारदार नरेशचंद्र सिंघ**<br>विषय:- Urgently Declare Wetlands of Sector 17 and 19 Kharghar "No Development Zone"! | समितीने "NO Development Zone" घोषीत करण्याचा विषय हा या समितीच्या क्षेत्राबाहेर आहे. त्यामुळे समितीने ही तक्रार पुढील बैठकीपासून बंद करण्याचे आदेश दिले आहेत. | सदस्य सचिव |
| १५ | **श्री. स्टॅलिन डी**<br>Massive illegal reclamation of coastal wetland at Mumbra by Thane Municipal corporation. | या तक्रारी संदर्भात ठाणे महानगरपालिका यांनी त्यांच्या अहवालानुसार तक्रारदारासोबत दि.२९/०५/२०१८ रोजी स्थळ पहाणी केली.<br>• त्यानुसार महानगरपालिके तर्फे भराव काढून Mudflat Restore करण्याचे काम सुरु करण्यात आले आहे असे सांगितले. तसेच आता पर्यंत ३० टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरीत काम पुढील आठवडयात पूर्ण होईल असे सांगितले.<br>• श्री.स्टॅलिन यांनी ठाणे महानगरपालिकेने काही कामे MCZMA यांच्या परवानगी शिवाय काम चालू करत आहेत असे सांगितले.<br>• त्यानुसार समितीने कोणतेही काम करताना आवश्यक त्या परवानग्या घेतल्यावर काम चालू करावे असे सांगितले.<br>• वरील आदेश देऊन समितीने ही तक्रार बंद करण्याचे आदेश दिले आहेत. | आयुक्त, ठाणे महानगरपालिका. |
| १६ | **इतर विषय** | समितीच्या अध्यक्षांनी दि.२१.१२.२०१७ च्या बैठकीमध्ये सर्व जिल्हाधिकाऱ्यांना असे सुचित केले की प्रत्येक जिल्हयातून त्या वन विभागाशी सल्लामसलत करुन कमीत कमी एक अशी योग्य त्या वेटलॅन्ड क्षेत्राची निवड करावी जी जैवविविधतेने व पर्यावरणीयदृष्टया महत्वाची आहे. जेणेकरुन स्थानिक नागरीकांच्या सहाय्याने वेटलँन्ड क्षेत्र पर्यटन स्थळ (Eco-Tourism) म्हणून विकसीत करता येईल. | सर्व जिल्हाधिकारी |

<table>
<tr><td></td><td></td><td>प्रात्प जिल्हयांची माहिती पुढील तकत्यात दिली आहे.
<table>
<tr><th>जिल्हा</th><th>निवडलेले पाणथळ क्षेत्र</th></tr>
<tr><td>ठाणे</td><td>रेती बंदर, पारसिक</td></tr>
<tr><td>मुंबई उपनगर</td><td>बोरीवली</td></tr>
<tr><td>मुंबई शहर</td><td>-</td></tr>
<tr><td>रायगड</td><td>मुरबे खालापूर व फेटवणे</td></tr>
<tr><td>रत्नागिरी</td><td></td></tr>
<tr><td>सिंधुदुर्ग</td><td>पावशी ता. कुडाळ मुळदे धरण</td></tr>
<tr><td>पालघर</td><td>पानजु ता. वसई</td></tr>
</table>
रत्नागिरी जिल्हयातून कोणीही प्रतिनीधींनी उपस्थित नव्हते. त्यानुसार समितीने त्यांना योग्य पाणथळ जागा सूचविण्यास सांगितले.</td><td></td></tr>
<tr><td>१७</td><td>तक्रारदार श्री. झोरु भातेना<br>विषय :- Illegal dumping on low lying CRZ-II NDZ land at CTS No 229A of Village Anik, in M/West Ward, by Mumbai Metro 3 (MMRCL)</td><td>ही तक्रार पाणथळ क्षेत्राशी संबंधीत नसल्याने सदर तक्रार ही जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांना पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्याबाबत समितीने सांगितले व सदर विषय हा बंद करण्याबाबत सांगितले.</td><td>सदस्य सचिव</td></tr>
<tr><td>१८</td><td>श्री. धिरज परब<br>मीरा भाईंदर महापालिकेने आरक्षण क्र. १२२ डी – दफनभूमी प्रकरणी MCZMA ची तद्यन फसवणूक व दिशाभूल करुन घेतलेली मंजूरी रद्द करणे.</td><td>या तक्रारी संदर्भात अतिरिक्त आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपालिका यांना चौकशी करुन या बाबतचा अहवाल सादर करण्याबाबत मागील बैठकीत समितीने सांगितले होते. त्यानुसार उप-आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपालिकेने MCZMA ची परवानगी घेतलेली आहे असे सांगितले. त्या अनुषंगाने समितीने त्या बाबतचा अहवाल सादर करण्याबाबत सांगितले.</td><td>आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका</td></tr>
<tr><td>१९</td><td>श्री. सुनिल अगरवाल<br>Complete Destruction of Wetlands and Mangroves in Sector 14 of Kharghar</td><td>समितीने सदर जागेची स्थळ पहाणी करुन आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना सिडको यांच्या उपस्थित प्रतिनिधींना दिल्या व त्या बाबतचा अहवाल पुढील बैठकीमध्ये सादर करण्याबाबत सांगितले.</td><td>सिडको आणि<br>जिल्हाधिकारी रायगड</td></tr>
<tr><td>२०</td><td>श्री. स्टॅलिन डी व श्री. रोहीत जोशी Improper investigation and filling or FIR</td><td>EPA 1986 अंतर्गत कोणती यंत्रणा FIR दाखल व Investigation करेल व याबाबत चर्चा करण्यात आली. त्यानुसार समितीने या संदर्भात Legal Opinion घेण्याचे ठरविले आहे.</td><td>जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर<br>आणि<br>सदस्य सचिव</td></tr>
<tr><td>२१</td><td>श्री. स्टॅलिन डी.<br>Reclamation of Wetlands by Thane Municipal Corporation</td><td rowspan="2"><ul><li>या तक्रारीबाबत समितीने सदर जागेची स्थळ पहाणी करुन आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना ठाणे महानगरपालिकेला दिल्या आहेत.</li><li>त्याअनुषंगाने या तक्रारींबाबतचा लेखी अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्यास समितीने सांगितले.</li></ul></td><td rowspan="2">ठाणे महानगरपालिका</td></tr>
<tr><td>२२</td><td>Complaint No: KW7<br>Wetland destruction</td></tr>
</table>

| | | | |
|---|---|---|---|
| २३ | Complaint No: KW9<br>श्री. ओमकार केणी<br>Dhamapur Lake wetland repeated Violations. | • घामापूर तलाव हा विषय NGT अंतर्गत येत असल्याने सदर तक्रार ही बंद करण्याच्या सूचना समितीने दिल्या होत्या.<br>• आता पुन्हा सदर तक्रार ही कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीच्या वेब साईटवर प्राप्त झाली आहे त्यामुळे सदर विषय हा कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती अंतर्गत येत नसल्याने समितीने ही तक्रार देखील बंद करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग. |
| २४ | Complaint No: KW13<br>श्री. राजीव दत्ता<br>Destruction of wetland mangroves at saket balkum road by TMC | समितीने या तक्रारी बाबतचा अहवाल ठाणे महानगरपालिका यांना पुढील बैठकीमध्ये सादर करण्याबाबत सांगितले. | जिल्हाधिकारी, ठाणे<br>आणि<br>ठाणे महानगरपालिका |
| २५ | Complaint No: KW14<br>श्रीमती उल्का शुक्ला<br>Mass destruction via dumping of debris | समितीने सिडको यांच्या प्रतिनिधींना या तक्रारी बाबतचा अहवाल पुढील बैठकीमध्ये सादर करण्याबाबत सांगितले. | सिडको आणि<br>जिल्हाधिकारी रायगड |
| २६ | Complaint No: KW15<br>श्री. राजीव दत्ता.<br>Illegal unauthorised dumping of building materials in the thane Creek opposite the thane COMM | समितीने या तक्रारी बाबतचा अहवाल ठाणे महानगरपालिका यांना पुढील बैठकीमध्ये सादर करण्याबाबत सांगितले. | ठाणे महानगरपालिका |
| २७ | श्रीमती कांचन पुरोहीत<br>Wetlands and Mangroves in Nerul, Navi Mumbai | • समितीने या तक्रारीबाबत सिडको यांना जागेचे संरक्षण करण्यास सांगितले.<br>• उप आयुक्त, नवी मुंबई पोलीस यांच्यामार्फत सदर क्षेत्रात होणाऱ्या पारटया, उपक्रमे व मद्यपान ही प्रकरणे थांबविण्यासाठी सायंकाळी व रात्रीच्या वेळी ग्रस्त ठेवण्याबाबतचे आदेश देऊन सदर तक्रार ही बंद करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | सिडको |
| २८ | श्री. नंदकुमार पवार<br>Feedback on site visit of Uran taluka. 1) Dastan phata jasai, where almost 100 acres of wetland is reclaimed, Reclamation still continue. | या तक्रारीबाबत समितिने सिडको आणि जिल्हाधिकारी रायगड यांना या तक्रारी संदर्भात स्पष्टीकरण अहवाल देण्याबाबत सांगितले आहे. | सिडको<br>आणि<br>जिल्हाधिकारी रायगड |
| | 2) Coastal road - There are huge patches of mangroves have found dead either side of the coastal road by blocking of tidal water flow. | या तक्रारीबाबत समितिने सिडको आणि जिल्हाधिकारी रायगड यांना या तक्रारी संदर्भात स्पष्टीकरण अहवाल देण्याबाबत सांगितले आहे. | सिडको<br>आणि<br>जिल्हाधिकारी रायगड |

| | | | |
|---|---|---|---|
| | 3) At panja Dongri 289 hectares of mangroves stretch may be vanished due to blocking of tidal water flow by construction of concrete wall and installing of sluice gates.This stretch can be saved if, will to save, by restoration of tidal water flow. | या तक्रारीबाबत समितिने सिडको आणि जिल्हाधिकारी रायगड यांना या तक्रारी संदर्भात स्पष्टीकरण अहवाल देण्याबाबत सांगितले आहे. | सिडको आणि जिल्हाधिकारी रायगड |
| | 4) At terminal 4 of JNPT, 4550 mangroves trees (4.5 hectares) have killed needlessly. Forest department and tehsildar have confirmed the killing of mangroves. This site yet to be visited FIR must be filed against JNPT for killing of mangroves. | या तक्रारीबाबत समितिने जिल्हाधिकारी रायगड यांना या तक्रारी संदर्भात स्पष्टीकरण अहवाल देण्याबाबत सांगितले आहे. | जिल्हाधिकारी रायगड |
| | 5) Reclamation on mangroves at Belpada by JNPT, for SEZ. Dumping continues in full swing. | या तक्रारीबाबत समितिने जिल्हाधिकारी रायगड यांना या तक्रारी संदर्भात स्पष्टीकरण अहवाल देण्याबाबत सांगितले आहे. | |
| २९ | श्री. धिरज परब :- मीरा भाईंदर महापालिका हद्दीतील मीरारोड पश्चिम येथे नाझरेथ आगर परिसरात सरकारी व खाजगी जागेत कांदळवन , पाणथळ चा ऱ्हास करून व सीआरझेड चे उल्लंघन | समितीने सदर जागेची स्थळ पहाणी करुन आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना मीरा भाईंदर महापालिका यांच्या उपस्थित प्रतिनिधींना दिल्या व त्या बाबतचा स्पष्टीकरण अहवाल पुढील बैठकीमध्ये सादर करण्याबाबत सांगितले. | जिल्हाधिकारी ठाणे |
| ३० | श्री. धिरज परब:- पालघर जिल्हयातील वसई तालुक्यात वरसावे पूल महामार्गापासून लोढा जैन मंदिर पर्यंतच्या परिसरात कांदळवन, पाणथळचा नाश करुन सीआरझेड,इकोसेन्सेटिव्ह झोनमध्ये चाललेल्या प्रचंड भराव- बांधकामा प्रकरणी. | समितीने सदर जागेची स्थळ पहाणी करुन आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी पालघर यांना दिल्या व त्या बाबतचा अहवाल पुढील बैठकीमध्ये सादर करण्याबाबत सांगितले. | जिल्हाधिकारी पालघर |

| | | | |
|---|---|---|---|
| ३१ | श्री. धिरज परब: - वरसावे, चेणे, काशी, घोडबंदर, मिरे या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानालगतच्या इको सेन्सेटिव्ह झोन मधील बेकायदा भराव, बांधकामे तातडीने थांबवून निष्कासित करणे बाबत. | समितीने सदर जागेची स्थळ पहाणी करुन आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना ठाणे महानगरपालिका यांच्या उपस्थित प्रतिनिधींना दिल्या व त्या बाबतचा अहवाल पुढील बैठकीमध्ये सादर करण्याबाबत सांगितले. | ठाणे महानगरपालिका |

सदर सभेत उपस्थित असलेल्या सभासदांचे आभार मानून बैठक संपल्याचे सचिवांकडून जाहिर करण्यात आले.

अध्यक्ष
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा
विभागीय आयुक्त कोकण विभाग.